I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0106 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/02/2025 22:37 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 06/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 06/02/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 14:49 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 06/02/2025 **Time (वेळ):** 22:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 060 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 06/02/2025 22:37 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, , सोलापूर कार्यालय,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौदागर अभिमन्यू गव्हाणे

(b) **Father's Name (चे नाव ):** अभिमन्यू गव्हाणे

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विठ्ठलवाडी, , ता माढा, जि सोलापूर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | विठ्ठलवाडी, , ता माढा, जि सोलापूर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9096805622

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | घनश्याम अंकुश मस्के | | वडील चे नाव : अंकुश मस्के | 1. 33,श्री विठ्ठल महादेव निचळ,यांच्या घरी भाडेतत्वावरमरगु,Town/Village (शहर / गाव): अपार्टमेंट यशवंत सूतमील,Tehsil (तहसील): समोर,अक्कलकोट रोड,सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): सदर बाज़ार,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील 500/ रुपये दराच्या नोटा | 20,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12.

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**First Information contents (प्रथम खबर हकिगत):**
फिर्यादी जबाब दि. 06.02.2025

मी सौदागर अभिमन्यू गव्हाणे, वय- 53 वर्षे, व्यवसाय- शिक्षक, श्री संत माणकोजी महाराज प्रशाला,वाकाव, माढा, रा. विठ्ठलवाडी, ता. माढा जि. सोलापूर मो.नं.9096805622 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, मी श्री संत माणकोजी महाराज प्रशाला, वाकाव, माढा, या शाळेत सुमारे 27 वर्षापासून शिक्षक या पदावर नोकरी करत आहे. मी सदर प्रशालेत सुमारे 27 वर्षापासून शिक्षक पदावर कार्यरत असून, माझ्या सेवाकालावधीस 24 वर्षे पुर्ण झाल्याने 24 वर्षे सेवा पुर्ण झाल्यानंतर देय असणा-या निवड श्रेणी मान्यतेकरीता मी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत दि.25/10/2023 रोजी मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांना रितसर प्रस्ताव दाखल केलेला होता. सदर निवड श्रेणी मान्यतेकरीता मी शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर येथील श्री. घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहाय्यक यांच्याकडे पाठपुरावा करत होतो, दरम्यान दि.21/01/2025 रोजी मी श्री घनश्याम मस्के यांना माझ्या निवड श्रेणी मान्यतेच्या कामाबाबत भेट घेतली असता, त्यांनी निवडश्रेणी मंजुर करण्यासाठी म्हणून माझ्याकडे 35000/- रुपये रकमेची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना काम पुर्ण झाल्यावर देतो असे सांगून माझे काम पुर्ण करण्याची विनंती केली असता, त्यांनी पैसे दिल्याशिवाय तुमची फाईल शिक्षणाधिकारी साहेबांपुढे सहीसाठी पाठवणार नाही असे सांगितले. त्यामुळे मी घाबरून नाईलाजास्तव त्यावेळी त्यांना 5,000/- रुपये दिले होते, त्यावेळी त्यांनी उर्वरित रु. 30,000/- व प्रस्तावात कागदपत्रे कमी असल्याचे सांगून सेवाजष्ठता यादी, वरिष्ठ श्रेणीधारक यादी व निवडश्रेणी धारक यादी आणुन देण्यास सांगितले होते.

आज दि.06/02/2025 रोजी मी सकाळी 10.00 वाजण्याचे सुमारास घनश्याम मस्के यांचे मोबाईल क्र. 8308775615 यावर कॉल करुन सेवाजष्ठता यादी, वरिष्ठ श्रेणीधारक यादी व निवडश्रेणी धारक यादी कागदपत्रे घेवून येत असल्याबाबत सांगितले असता, त्यांनी मला सदर कागदपत्रांसोबतच 40,000/- रुपये घेवून येण्यास सांगितले. माझी नोकरी 24 वर्षे पुर्ण झाली असून, 24 वर्षे सेवा पुर्ण झाल्यानंतर देय असणा-या निवड श्रेणी मान्यतेकरीता श्री घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर हे माझ्याकडे 40,000/- रुपये लाचेची मागणी करीत असून माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि.06/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे समक्ष येवून तक्रार दिली. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पोनि पिंगुवाले यांनी सोलापूर महानगरपालिका येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिल्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. त्यावर पोनि पिंगुवाले व पंचानी सह्या केल्या.सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि. पिंगुवाले यांनी मला श्री घनश्याम मस्के यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, त्यांची शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर येथे होईल असे मी सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये त्यामध्ये यापुर्वी कोणतेही

रेकॉर्डींग नसल्याचे खात्री करून दिली आणि व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून मला श्री घनश्याम मस्के यांची भेट घेण्याकरीता पंच क्र. 1 यांच्यासह माझी मोटार सायकल क्र. एमएच 45 एपी 3705 युनिकॉर्न यावरुन 14.49 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथून रवाना केले. मी व पंच क्र. 1 दोघे शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर या कार्यालयात जावून श्री घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांची भेट घेतली, त्यावेळी आमच्यात माझ्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान त्यांनी वरिष्ठ वेतन श्रेणी.. सेवा ज्येष्ठता.. निवड श्रेणी धारक यादी कुठ हाय.. असे विचारले, त्यावर मी त्यांना सदर कागदपत्रे प्रस्तावामध्ये लावलेले आहेत असे सांगितले, त्यानंतर त्यांनी मला संच मान्यता कुठ हाय? असे विचारुन संच मान्यता लागतय की.. व्हॉट्सअँपवर मागवून घ्या.. प्रिंट काढू आपण.. असे सांगितले. त्यावेळी मी माझ्या शाळेचे मुख्याध्यापक यांना कॉल करुन संच मान्यतेची प्रत व्हॉट्सअँपवर पाठविण्यास सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान मी मस्के यांना करा की तेवढं असे बोलून काम पुर्ण करण्याची विनंती केली असता, मस्के यांनी मला तेवढं नाही सगळच करून जाव लागल त्याशिवाय मंगळवार बुधवार होणार नाही असे बोलून लाचेचा विषय काढला. त्यावेळी मी किती असे विचारले असता, त्यांनी सांगितलय की तुम्हाला असे बोलले त्यानंतर पुन्हा काहीवेळ चर्चा केल्यानंतर मस्के यांनी मला सांगितलय की तुम्हाला असे बोलून पेन्सिलने एका कागदावर 40 असा आकडा लिहून दाखवला, त्यावेळी मी त्यांना किती चाळीस? पस्तीस म्हणल होत की.. असे विचारले असता, त्यांनी ए नाही.. असे चिडून बोलून चाळीस हजार रुपये देण्यास सांगितले. त्यांवेळी मी त्यांना नाही नाही.. साहेब ऐका की एक मिनिट.. नव्ह.. तुम्हाला त्यातले पाच हजार दिले नाहीत मी ? असे विचारले असता, त्यांनी दिलेल मला माहित हाय.. ते दिल की असे बोलून यापुर्वी रुपये 5,000/- स्विकारलेबाबत कबुल केले. त्यावर मी त्यांना नाही... आता ठरलेल त्यात तरी करा की ओ.. आता मी तर म्हणल होत राव जरा कमी करसाल.. असे सांगून लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी इथ कमी नसतय इथ.. त्याज ते विषयच.. सगळ्या सह्रा घेतलेल्या हायत इथ सगळे असे सांगून लाच रक्कम कमी होणार नाही असे सांगितले. त्यावेळी चर्चेदरम्यान मस्के यांनी बर तुमच बी नको माझ बी नको बत्तीस देऊन टाका असे सांगून तडजोडीवरून 32000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी बर होय.. करा की दोन कमी तेवढ.. लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी अहो तेवढ तर मला मिळू दे की.. अस का करायलाव.. असे म्हणाले. त्यानंतर मी श्री मस्के यांच्याशी संच मान्यतेच्या कागदपत्रांबाबत चर्चा करून वीस मी अता देतो राहिलेले जे आहे ते सोमवार मंगळवार ती घेताना देतो असे सांगून पहिला हप्ता 20,000/- रुपये घेऊन येतो असे सांगितले असता मस्के यांनी ठिक आहे असे सांगितलेसदर पडताळणी कारवाईदरम्यान श्री घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी माझ्याकडे 40,000/- रुपये लाचेची मागणी यापुर्वी करुन 5000/- रुपये स्विकाल्याचे मान्य करुन तडजोडीअंती 32,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणून रु. 20,000/- लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पिंगुवाले यांनी श्री घनश्याम मस्के यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेले 20,000/- रू. रक्कमेच्या नोटांना त्यांचे

स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवले. सदरवेळी पोनि. पिंगुवाले यांनी माझ्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी व्हॉट्सअॅपवर मला पाठविलेले संच मान्यतेचे कागदपत्र प्रिंट काढून माझ्याकडे दिला. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 असे दोघांना माझ्या मोटार सायकल वरुन श्री घनश्याम मस्के यांची भेट घेण्याकरीता 15.44 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथून रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र. 2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद सोलापूर गेटच्या बाहेर शासकिय वाहन थांबवून ते पायी चालत येवून शिक्षणाधिकारी कार्यालय (माध्यमिक) येथील आवारात बाहेरील बाजूस कोणास संशय येणार नाही असे सापळा लावून थांबलेमी व पंच क्र. 1 असे दोघे शिक्षण विभाग (माध्यमिक) या कार्यालयत जावून मस्के यांची भेट घेतली व त्यांनी सागितलेला संच मान्यतेचा कागद त्यांचेकडे देऊन लाव बर फाईलला लगीच असे सांगितले. त्यानंतर त्यांनी सदर कागद माझ्या प्रस्तावाच्या फाईलला लावला, त्यानंतर त्यांनी मंजूर शिक्षक पदे किती आहेत याबाबत मला विचारणा केली, मी आठ पद मंजूर असून एक पद रिक्त असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी फाईल आणा हिकडचं.. घेवून जावा..बाहेर जावा..फाईलमध्ये घालून आणा, तीकड बाहेर जावा असे बोलून प्रस्तावाची फाईल माझ्याकडे देवून बाहेर जावून लाचेची रक्कम फाईलमध्ये ठेऊन आणून देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना अस करु काय..नव्ह ऐका की..आता वीस हजार दिलेत ह्याज्यावर तूमी लिहुन ठेवा पुना आणि काय होतय माहित हाय का..पुना आणि अकडा वाढतोय आहे.. असे सांगितले असता, मस्के यांनी नाय नाय वाढत.. जावा असे म्हणुन लाच रक्कम फाईलमध्ये ठेऊन आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदरची फाईल घेवून बाहेर जिन्या जवळ येवून लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या खिशातून काढून मस्के यांनी दिलेल्या केशरी रंगाच्या प्रस्तावाच्या फाईलमध्ये ठेवून आतमध्ये येवून मस्के यांच्याजवळ गेलो. त्यावेळी त्यांनी द्या.. असे बोलून फाईल ताब्यात घेतली. त्यावर मी त्यांना पडतेल नीट ठेवा.. असे बोलून फाईलमध्ये ठेवलेली लाच रक्कम पडेल असे मस्के यांना सांगितले असता, त्यांनी जावा मंगळवार बुधवार या..आं.. असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना ऐका की..वीस हजार दिलेती.. असे सांगितले असता, मस्के यांनी हं.. असे म्हणाले. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे मो.क्र. 9096805622 वरुन पोनि पिंगुवाले यांचे मो.क्र. 9067891014 वर मिस्ड कॉल करुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी बाहेर थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोनि पिंगुवाले यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारलेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना माझ्या समोर खुर्चीवर बसलेले घनश्याम मस्के यांच्याकडे हाताने इशारा करुन त्यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला व मस्के यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहायक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर राहणार- श्री विठ्ठल महादेव निचळ यांच्या घरी भाडेतत्वावर, रुम नं. 33, मरगु अपार्टमेंट, यशवंत सूतमील समोर, अक्कलकोट रोड, सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मस्के यांचे ताब्यातून स्विकारलेली लाच रक्कम व प्रस्तावाची फाईल पंचासमक्ष हस्तगत केली आणि

सदर ठिकाणी सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर घनश्याम मस्के यांना ताब्यात घेवून सापळा कारवाई झाले बाबत श्री सचिन जगताप, शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले. तरी आज दि.06/02/2025 रोजी 14.49 ते 16.00 वा चे दरम्यान लोकसेवक श्री घनश्याम अंकुश मस्के, पद- वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर राहणार- श्री विठ्ठल महादेव निचळ यांच्या घरी भाडेतत्वावर, रुम नं. 33, मरगु अपार्टमेंट, यशवंत सूतमील समोर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी मला शिक्षक पदावर 24 वर्षे सेवा पुर्ण झाल्यानंतर देय असणा-या निवड श्रेणी मान्यतेकरीता माझ्याकडे कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन रु. 40,000/- लाचेची
मागणी करुन यापुर्वी 5000/- रुपये स्विकाल्याचे मान्य करुन तडजोडीअंती 32,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणून 20,000/- रुपये लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची पिंटर काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ajit shankar lakade (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ajit shankar lakade

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1985 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**